# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## शिक्षकेत्तर पदभरती जाहिरात

जाहिरातक्रमांक:- २४/२०१८ दिनांक:-२३/०२/२०१८

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील शासनमान्य शिक्षकेत्तर रिक्त पद सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

**गट "अ"**

**पदाचेनांव:- जनसंपर्क अधिकारी** **पदसंख्या:- ०१** **आरक्षण:- खुला**

वरील रिक्त पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व संगणकीय अर्हता, अनुभव, वय, आवेदन शुल्क ईत्यादीबाबतची माहिती तसेच अर्जदारासाठी आवश्यक सुचना, अटी व शर्ती आणि आवेदन पत्राचा विहीत नमुना विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्जाच्या विहीत नमुन्यातच अर्जदाराने **कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचेकडे दिनांक २६/०३/२०१८ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

**कुलसचिव(प्र.)**

● **या जाहिरातीव्दारे भरावयाच्या पदाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **वेतन संरचना** | **पदसंख्या** | **प्रवर्ग** |
|---|---|---|---|---|
| ०१ | जनसंपर्क अधिकारी | ९३००-३४८०० ग्रे.वे. ५४०० | ०१ | खुला |

● **जाहिराती मधील पदाकरीता आवश्यक असणारी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव.**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **शैक्षणिक अर्हता, अनुभवाचे निकष** |
|---|---|---|
| ०१ | जनसंपर्क अधिकारी<br><br>वेतन बँड<br>९३००-३४८००<br>ग्रे.वे. ५४०० | **शैक्षणिक अर्हता:-**<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची मॉसकम्युनिकेशन / जर्नालिझम / पब्लीक रिलेशन किंवा समकक्ष विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण प्रसार माध्यमा मधील (उपसंपादक दर्जापेक्षा कमी नसावा.) / शासन मान्यता प्राप्त संस्थेमधील संपादकीय कामाचा अथवा जनसंपर्क अधिकारी पदाचा किमान पाच वर्षाचा अनुभव.<br>२. मराठी, इंग्रजी व हिन्दी या भाषावर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य आवश्यक. |

● **संगणक अर्हता**

उमेदवाराला MS-CIT या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

● **वयोमर्यादा**

१. किमान वयोमर्यादा ३० वर्षे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमीत/कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू राहणार नाही.

● **अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना**

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्याआधी व पाठविण्यापूर्वी त्याची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, प्रवर्ग इत्यादी वरील बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) सदर जाहिरातीतील पदसंख्या, निवड प्रक्रिया व नेमणुक ही शासन मान्यतेच्या अधिनस्त राहतील.

२) सदर जाहिरातीतील अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

३) सदर जाहिरातीतील पदासाठी छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन चाचणी परिक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाव्दारे आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर निर्णय उमेदवारांना बंधनकारक राहील.

४) उमेदवारांनी विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावरून उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्येच टंकलिखीत, हस्तलिखीत किंवा संगणकिय प्रिंट केलेला अर्ज **नऊ प्रतीत(सहपत्रासह)** सादर

करावा. विहीत नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमुद करावे. अर्जदाराने आवेदनपत्रातील **प्रपत्र अ** मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

५) अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत:चा स्वसांक्षाकित केलेला फोटो लावावा.

६) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर सर्टीफिकेट इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती स्वसाक्षांकित करून जोडाव्यात. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.

७) अर्जासोबत मागावर्गीय(अ.जा., अ.ज., वि.जा., भ.ज., वि.मा.प्र. व इ.मा.व. इत्यादी) उमेदवारांनी रूपये ३००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रू. ५००/- चा **वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचे नावे काढलेला धनाकर्ष(Demand Draft) जोडावा.

८) सदर पदाकरीता अर्ज करतांना लिफाफ्यावर "**जनसंपर्क अधिकारी**" या पदाकरीता अर्ज असे लिफाफ्यावर लिहून दिनांक २६/०३/२०१८ रोजी सायं. ०५.३० वाजपर्यंत **"कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली पिन ४४२६०५"** यांच्याकडे उपरोक्त नमुद केलेल्या तारखेपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.

९) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, इतर विद्यापीठे किंवा शासकिय सेवेत कार्यरत असलेल्या अर्जदारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयामार्फत (Through Proper Channel) सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच म्हणजेच दिनांक २६/०३/२०१८ रोजी सायं. ०५.३० वाजेपर्यंत सादर करावयाचे आहे. उपरोक्त मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

१०) अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहीत नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेले(Non-Creamy Layer) प्रमाणपत्र, जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र इत्यादी लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित स्वसाक्षांकित नसलेल्या प्रती न जोडलेले अर्ज, अर्जासोबत आवश्यक राशीचे धनाकर्ष न जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रासह नऊ प्रतीमध्ये नसलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

११) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

१२) अर्जाच्या छाननी अंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधीत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१३) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकिय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र समजले जाईल.

१४) मुलाखतीस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१५) विद्यापीठ प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरीता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१६) निवड प्रक्रिया सूरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती उपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

१७) उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी (Probation Period) हा महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८४ च्या अधिन राहील.

१८) अर्जदाराला अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यात बदल करावयाचा असल्यास याबाबत उपकुलसचिव, आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना त्वरीत कळवावे लागेल.

१९) ई-मेल किंवा फॅक्सव्दारे प्राप्त झालेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

२०) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल, २०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे राहील. या शिवाय ज्या प्रवर्ग/घटकाकरीता सध्या असलेली कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे. त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात येणार नाही.

२१) अनुसूचित जाती व जमाती व्यतीरिक्त वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू आहे अशा संबंधीत उमेदवारांनी शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ०५ जून, २००६ नुसार त्याबाबतचे अप्रगत गट प्रमाणपत्राची मुळ प्रत मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

२२) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक १४/२०००/प्र.क्र.४३/व-१०, दिनांक २४ मे, २००१ नुसार निवड झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवाराला जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच नेमणुकीचे आदेश पत्र देण्यात येईल.

२३) शासन अधिसूचना, सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५००/मावक-५, दिनांक ०५ मार्च, २००५ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना(अनुसूचित जमाती वगळून) सहा महिन्यांच्या कालावधीत तत्सम प्राधिकरणाकडुन जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करावे लागेल.

२४) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने भरतीकरीता वेळोवेळी जाहिर केलेले सर्व शासन निर्णय बंधनकारक राहतील.

२५) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१(१७/२०००)/१२, दिनांक २८ मार्च, २००५ नुसार शासन सेवेतील गट अ ते गट ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यासाठी विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागू केलेली आहे. या नियमातील तरतुदीनुसार शासकिय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

दिनांक :- २३/०२/२०१८
ठिकाण:- गडचिरोली.

कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली